# पूर्व विदर्भातील मराठी बोलींचा चिकित्सक अभ्यास
# (पोवारी आणि कोहळी या दोन बोलींच्या संदर्भात)



| संशोधक | मार्गदर्शक |
|---|---|
| **तुलसीदास रुपदास गभने** | **डॉ. रामलाल चौधरी** |
| स्नातकोत्तर मराठी विभाग | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| रा. तु. म. नागपूर विद्यापिठ, नागपूर | पेट्रोल पंप जवाहरनगर, जिल्हा भंडारा |



---

**परिचय :**

भाषा ही माणसाचे संपूर्ण जीवन व्यापून टाकणारी संस्था आहे. भाषा अभ्यासाचे क्षेत्रही खूप व्यापक आहे. भाषा ही नित्य परिवर्तनीय असल्यामुळे भाषेत सतत बदल होत असतो. त्यामुळे ती खूप गुंतागुंतीची आहे. भाषेच्या अभ्यासाला खूप मोठी परंपरा आहे असे आपणाला दिसून येते. सुरुवातीला ऐतिहासिक, तौलनिक भाषा विज्ञानाच्या क्षेत्रात मोठी प्रगती झाली परंतु आधुनिक काळात भाषांचा अभ्यास करतांना तो वैज्ञानिक पातळीवर झालेला आहे. त्यामुळे वर्णनात्मक भाषाविज्ञान ही पद्धती सर्व भाषाभ्यास पद्धतीच्या केंद्रस्थानी आली असे दिसून येते.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भाषा वैज्ञानिक आणि भाषाशास्त्रीय दृष्टिकोनातून बोलीचे स्वरूप, स्थान, सहसंबंध, भाषा व बोलीचे कार्य, बोली व समाजाचा सहसंबंध आणि बोलीच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास, खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाच्या रेट्यात बोलीभाषेवर इंग्रजी सारख्या भाषांचा प्रचंड मारा होवून बोली समूळ नाश पावतात की काय? अशी भीती निर्माण झाली आहे अशावेळी बोलीचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे.

मराठी वाङ्मयात विविध प्रकार आणि प्रवाह आहेत. आजचा वर्तमान उद्याचा भुतकाळ आहे. जगाच्या पाठीवर माणूस असेपर्यंत साहित्य निर्मिती होत राहील.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- पूर्व विदर्भातील पोवारी आणि कोहळी बोलींचे स्वरूप अभ्यासणे.
- पूर्व विदर्भातील पोवारी आणि कोहळी बोलींची रुपव्यवस्था अभ्यासणे.
- पूर्व विदर्भातील बोलीवरील राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक व भिन्न भाषिक लोकांमुळे होणारा परिणाम यांचा शोध घेणे व त्यातून निर्माण झालेल्या नव्या भाषिक व सांस्कृतिक रूपांचा शोध घेणे.
- बोलींचे समाजातील स्थान समजून घेणे.
- बोलींची समाज विशिष्टता समजून घेणे.
- पूर्व विदर्भातील पोवारी व कोहळी बोलींच्या कार्याचा परामर्श घेणे.

- पूर्व विदर्भातील पोवारी व कोहळी बोलींची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

**संशोधनाची गृहीतके :**

- मराठी भाषेमध्ये विविध बोली असल्या तरी पोवारी आणि कोहळी बोलीने साहित्य परंपरेत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.
- मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी भावविश्व, मराठी अभिरुची विश्व समृद्ध आणि व्यापक करण्यासाठी बोलीभाषा यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.
- पोवारी बोली आणि कोहळी बोलींची समीक्षा व मूल्यांकन करण्याचा प्रयत्न.
- पोवारी बोली आणि कोहळी बोलींचा आस्वादन-अर्थनिर्णयन-विश्लेषण-मूल्यमापन पद्धतीने शोध घेणे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :**

- मराठी भाषेत विविध बोलीभाषा असल्या तरी पोवारी आणि कोहळी बोली लेखनाची मर्यादा जाणीवपूर्वक प्रस्तुत संशोधनासाठी स्विकारण्यात आली आहे.
- पोवारी बोली आणि कोहळी बोली मधून विविध रूपांचा शोध प्रस्तुत संशोधनातून केला जाणार आहे.
- विदर्भातील बोलींचा अभ्यास करताना तो मूळ मराठी बोलीपेक्षा पूर्व विदर्भातील पोवारी आणि कोहळी बोलीतील स्वनिमव्यवस्था, रुपिमव्यवस्था आणि अर्थव्यवस्था यामधील बदल अभ्यासणे.
- पोवारी बोली आणि कोहळी बोलीवर राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक दळण-वळण त्याचबरोबर भिन्न भाषिक संक्रमण यांचा प्रभाव कसा पडला व त्याचा परिणाम काय दिसून येतो ते तपासणे.
- पूर्व विदर्भातील व्यापारी, कामगार, रेल्वे स्टेशन, विविध बसस्थानके, लहान मोठी शहरे, गावे, लिंग, वय, सामाजिक स्तर, सांस्कृतिक प्रसंगातील भाषेचे नमुने गोळा करणे. त्याद्वारे अभ्यासाची प्राथमिक साधने उपलब्ध करणे आणि साहित्य निर्मितीचे पुरावे शोधणे व स्वरूप निश्चित करणे.

**संशोधन पद्धती आणि अभ्यास साधने :**

- प्रस्तुत प्रबंध लेखन करताना विषयाच्या संदर्भातील उपलब्ध संदर्भग्रंथ विविध वृत्तपत्रातील लेख, नियतकालिके, मुलाखती इत्यादी विविधांगी अभ्यास साधनांचा उपयोग करण्यात येईल. संबंधित विषयावरील उपलब्ध अधिकाअधिक संदर्भाचा उपयोग करून वस्तुनिष्ठ व वाङ्मयीन दृष्टीकोनातून विवेचन, विश्लेषण, मांडणी व मूल्यमापन करण्याचा प्रयत्न या प्रबंधात केला जाणार आहे.
- संशोधनासाठी वापरण्यात येणारी पद्धत ही वाङ्मयीन संशोधन पद्धती असणार आहे. आवश्यकतेनुसार विश्लेषणात्मक, वर्णनात्मक व काही प्रमाणात ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केल्या जाईल. तसेच मराठीत प्रचलित विविध अभ्यास पद्धतींचा प्रसंगोपात उपयोग या संशोधनात करण्यात येईल.
- पोवारी बोली व कोहळी बोलींचा अभ्यास करताना सूक्ष्म भाषाविज्ञानाचा अवलंब करण्यात येईल. सूक्ष्म

भाषा विज्ञान म्हणजे भाषेच्या अंतर्गत संरचनांचा अभ्यास. हा अभ्यास जसा वर्णनात्मक अभ्यास पद्धतीच्या आधारे करण्यात येईल तसाच तो समाज भाषा वैज्ञानिक पद्धतीने करता येईल. एकूण बोलींचे भाषिक रूप तपासणे आणि तिचे सांस्कृतिक-सामाजिक संदर्भ शोधणे असे या अभ्यासाचे स्वरूप राहील. तसेच या अभ्यासासाठी सर्वेक्षण पद्धतीचा ही अवलंब करण्यात येईल.

**निष्कर्ष आणि समालोचन :**

पूर्व विदर्भातील बोली व तिचे वेगळेपण आणि स्वतंत्र अस्तित्व यांचा शोध घेत असताना तो 'पूर्व विदर्भातील मराठी बोलींचा चिकित्सक अभ्यास' (पोवारी आणि कोहळी बोली) या अनुषंगाने करावयाचा आहे

वरील सर्व प्रकरणांच्या शेवटी अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष आणि समालोचन या प्रकरणात मांडण्यात येतील.

**संदर्भ ग्रंथसूची**


- झाडीबोली भाषा आणि अभ्यास - डॉ. बोरकर हरिश्चंद्र
- भाषिक भ्रमंती - डॉ. बोरकर हरिश्चंद्र
- मराठीचे प्रमाण लेखन - डॉ. हरिश्चंद्र बोरकर
- भाषा विज्ञान : वर्णनात्मक आणि ऐतिहासिक संपादक मालशे स.ग., सोमन अंजली
- आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन मालसे मिलिंद
- सुलभ भाषा विज्ञान - पुंडे द. दि.
- वैखरी - केळकर अशोक
- भाषाविज्ञान आणि मराठी भाषा - ग्रामोपाध्ये गं. ब.
- मराठीचा भाषिक अभ्यास - कानडे मु.श्री
- मराठीचे वर्णनात्मक भाषाविज्ञान - कदम महेंद्र
- मराठी भाषा उदगम आणि विकास - कुलकर्णी कु.पां